## -: प्रेसनोट :-

### घरफोडीच्या गुन्हयातील नऊ वर्षापासुन फरार असलेल्या आरोपीस गुन्हे शाखा, युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन अटक.

---

दिनांक १६/०५/२०२० रोजी गुन्हे शाखा,युनिट-४ कडील सहा.पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख व पो.ना..वसुदेव मुडे व पो.शि. सुखदेव गावंडे असे खाजगी वाहनाने हद्दीत पाहिजे व फरारी आरोपी चेक करीत असताना सताना पो. ना. मुंडे व पो.शि.गावंडे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, हिंजवडी पोलीस स्टेशनकडील घरफोडीचे गुन्हयातील सन २०११ पासुन पाहिजे असलेला आरोपी नामे अनिल कांबळे हा सध्या भक्ती शक्ती चौक निगडी जकात नाक्या जवळील पिंएमपिएल बसस्टॉप जवळ थांबला असुन त्याने अंगात लाल पांढरे व काळे रंगाचे पट्टे असलेला टि शर्ट व काळे रंगाची पँट घातलेली आहे. वगैरे मजकुरची बातमी मिळताच सपोनि देशमुख यांनी त्याबाबत वपोनि मोहन शिंदे यांना कळविले असता त्यांनी सदर बाबत खात्री करुन कारवाई करण्याचे आदेश दिल्याने सपोनि.अंबरिष देशमुख व वरील स्टाफ असे खाजगी वाहनाने निगडी जकात नाका येथे जावुन, मिळालेल्या बातमी प्रमाणे पाहणी करता, वरील वर्णनाचा इसम आणाभाऊ साठे उद्यानाचे गेट समोर उभा असल्याचे निदर्शनास आल्याने त्यास जागीच पकडुन त्याचे नावविचसारले असता त्याने त्याचे नाव अनिल दत्ता कांबळे वय.२८ वर्षे रा.ओटा नंबर एन/४,मिलींदनगर,ओटास्कीम निगडी पुणे असे असल्याचे सांगीतले त्यावेळी त्याचेकडे चौकशी करता तो उडवाउडवीची उत्तरे देवु लागल्याने त्यास गुन्हे शाखा युनिट-४,येथे आणुन त्याचे बाबत हिंजवडी पोलीस स्टेशनला खात्री करता तो हिंजवडी पोलीस स्टेशन गु.र.नं. १२७/२०११ मा.दं.वि.क.४५७,३८० या गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झालेने त्यास नमुद गुन्हयाचे कामी हिंजवडी पोलीस स्टेशनकडे वर्ग करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री.श्रीधर जाधव, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहा. पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा. अदिनाथ मिसाळ, संजय गवारे, प्रविण दळे, नारायण जाधव, दादाभाऊ पवार, पोना. वासुदेव मुंडे, शावरसिध्द पांढरे, लक्ष्मण आढारी, मोहम्मद नदाफ, तुषार शेटे, संतोष असवले, पोशि. सुरेश जायभाये, प्रशांत सैद, धनाजी शिंदे, तुषार काळे, व सुखदेव गावंडे, यांनी केली आहे.

**( मोहन दा.शिंदे )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवड

